## सं पा द की य

# आता पाणीकारणाकडे वळूयात!

अमरावती जिल्ह्यातील गावांनी यापूर्वी कधीही उन्हाळ्यात शासनाच्या टँकरने आणलेले पाणी पिले नव्हते. वर्धा शहरात उन्हाळ्यात पाणी पुरवठा दर दोन दिवसांनी होण्याची वेळ आली नव्हती. यावर्षी प्रथम हे होत आहे. वयाच्या चाळीशीत असलेल्या वैदर्भियांना असे दृश्य प्रथमच दिसते आहे. इकडल्या ७०% फळबागा जगोत किंवा मरोत, शेतकऱ्यांनी त्याची काळजी सोडली आहे. ३०% वाचवण्याचा प्रयत्न वैयक्तिक पातळीवर शेतकरी करीत आहेत. त्यासाठी मल्चिंग, ठिबकसारखी तंत्र वापरत आहेत. संपूर्ण महाराष्ट्रभर हीच स्थिती आहे.

पण नुकत्याच झालेल्या निवडणुकीत महाराष्ट्रात दुष्काळ हा मुद्दाच नव्हता. भाजप उमेदवारांना मोदींच्याच नावे निवडणूक जिंकता येते ही खात्री असल्यामुळे त्यांना त्याची अधिक माहिती करून घ्यावीशी वाटली नाही. विरोधी पक्षांनी आपल्या क्षेत्रातील दुष्काळी कृती आराखड्याची अंमलबजावणी, चारा छावण्या, पाणी वाटप हे मुद्दे उचलले, पण एकूणच राज्यातील सततच्या पाणी टंचाईचे करायचे काय, याचा कार्यक्रम त्यांच्याकडे नाही. त्यात पुन्हा भर येऊ घातलेल्या कमी प्रमाणातल्या मॉन्सूनमुळे पडणार आहे.

दिल्लीचे सरकार या सर्व स्थानिक प्रश्नांसाठी काही जबाबदार असते याची जाणीव शेतकऱ्यांमध्ये नाही. त्यामुळे त्यांनी पाकिस्तानला धडा शिकवणाऱ्या 'मजबूत' सरकारला निवडून दिले आहे. २०१४च्या निवडणुकीत हमी भाव दीडपट वाढवून देण्याचं वचन पूर्ण न करणाऱ्या मोदींना विदर्भातल्या शेतकऱ्यांनी २०१९च्या निवडणुकीत उदार मनाने माफ केले आहे. केंद्र सरकारचे शेतीमालाचे आयात निर्यात धोरण आपल्या आयुष्यावर काही परिणाम करते याची जाणीव शेतकऱ्यांना नसते आणि शेतीसंबंधी कोणत्याही अरिष्टाला फक्त राज्य सरकारच कारणीभूत असते असा एक समज असतो. येणाऱ्या विधानसभा निवडणुकांमध्ये तरी त्याचे काही प्रतिबिंब दिसते का, हे पाहावे लागेल.

महाराष्ट्राने जलसंकट ओढवून घेतलेले आहे, यावर तज्ज्ञांचे एकमत आहे. मराठवाड्यातील दुष्काळास ऊसाचे पीक जबाबदार असल्याचे अहवाल सरकार दरबारी पडून आहेत. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या माणिकराव कदम यांनी मराठवाड्यातील तीव्र दुष्काळी परिस्थिती पाहता येथील साखर कारखान्याचे क्रशिंग लायसन्स रद्द करावेत अशी मागणी केली पण ऐन निवडणुकीच्या धामधुमीत या मागणीकडे कुणाचे फार लक्ष गेले नाही. ऊसाऐवजी कमी पाण्याच्या सोयाबीन, तूर, मसूरसारख्या इतर पिकांकडे जाण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे असे कदमांचे म्हणणे आहे. कमी पाऊस झाल्यास या भागातील शेतकरी डाळ-वर्गीय पिकांकडे जातात, पण त्याच्या खरेदीचा आणि हमी भावदेखील न मिळण्याचा यापूर्वीच्या अनुभवाने त्यांचा कल पुन्हा ऊस लागवडीकडेच जातो. त्यामुळे कमी पाण्याच्या इतर पिकांच्या हमी भावातल्या खरेदीची व्यवस्था नीट राबवावी अशी मागणी जोर धरत आहे.

विदर्भात पूर्वी ४०% पेरा ज्वारीचा होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणात जनावरांसाठी वैरण मिळायचे आणि उन्हाळ्यातही मुबलक चारा उपलब्ध होत असे. आता केवळ २-४% ज्वारी घेतली जाते. वैरण म्हणून मुद्दाम मक्याची लागवड केली जाते. ज्वारीची घेतली जात नाही कारण परिसरात कमी ज्वारी घेतली की, ती पाखरांच्या भक्ष्य स्थानी पडते. त्यासाठी जिल्हा पातळीवर ज्वारीच्या लागवडीसाठी प्रत्येक शेतकरी दोन एकराचे बियाणे, हमी भावात ज्वारीच्या खरेदीची खात्री किंवा

थेट अनुदान सरकारने दिले पाहिजे. तसे झाल्यास चाऱ्याअभावी पोसण्याची क्षमता नाही म्हणून सोडून दिलेल्या जनावरांनाही पोसणेही शक्य होईल. कापूस एकाधिकार योजनेसारखी योजना १९९५नंतर खुली अर्थव्यवस्था आल्यावर युती शासनाच्या काळात तोट्यात गेली होती. शेतकरी संघटनेच्या नेत्यांनी तेव्हा खुल्या अर्थव्यवस्थेला समर्थन दिल्यामुळे नेत्यांनी आंतरराष्ट्रीय बाजारात कापूस (रुई) स्वस्त झाल्यामुळे ही योजना तोट्यात गेली असे मान्य केले नाही. फेडरेशनमध्ये खूप भ्रष्टाचार आहे आणि म्हणून ते बरखास्त झाले पाहिजे असा खोटा प्रचार केला आणि नंतर आलेल्या कॉंग्रेस-राष्ट्रवादीने तोटा आणि भ्रष्टाचाराचे निमित्त करून ती मोडीत काढली. पण १९९७मध्ये आंध्र प्रदेशात कापूस उत्पादकांच्या मोठ्या प्रमाणात आत्महत्या होत होत्या तेव्हा या योजनेने दिलेल्या हमी भावामुळे महाराष्ट्रात मात्र कमी झाल्या होत्या. उलटपक्षी योजना मोडीत निघाल्यावर विदर्भात शेतकरी आत्महत्यांची त्सुनामी आली.

कापूस कोरडवाहू पीक आहे आणि त्यात मजुरी देण्याची क्षमता ऊसापेक्षा अधिक आहे. तरी साखरेसाठी जे उपाय केले गेले ते रुई आणि कापड उद्योग वाचवण्यासाठी महाराष्ट्र सरकारने केले नाहीत. अगदी फेडरेशनच्या धर्तीवर नाही पण कपाशीच्याच नव्हे तर इतर कोरडवाहू पिकांच्याबाबत एक खरेदीदार म्हणून सरकारने बाजारात हस्तक्षेप करायला हवा होता. तसेच कोरडवाहू पिकांना प्रोत्साहन देणाऱ्या योजना महाराष्ट्रभर सातत्याने राबवणे आवश्यक होते. पण सरकार याबाबतीत काही करेल याची शाश्वती नाही. एकतर तूर खरेदीचे फडणवीस सरकारचे रेकॉर्ड आश्वासक नाही. दुसरं म्हणजे साखर कारखानदारीवर आणि पर्यायाने सहकारी सोसायट्यांवर नियंत्रण असलेले बरेचसे पूर्वीचे कॉंग्रेस-राष्ट्रवादीचे नेते आता भाजपात आहेत. देशाने खुली अर्थव्यवस्था स्वीकारून २८ वर्षे होऊन गेलीत तरी साखर उद्योग एक असा उद्योग आहे की, जो साखरसम्राटांनी सरकारच्या संपूर्ण नियंत्रणात ठेवला आहे. त्यातही आयात-निर्यात धोरण आणि अनेक अनुदानांचे बरेचसे नियंत्रण दिल्ली सरकारच्या हातात आहे. जागतिक बाजारात साखरेचा २३ रुपये किलो आहे. साखरेवर १००% आयातकर करून स्वस्त साखर देशात येण्यापासून रोखली आहे. इतर धान्य पिकांच्या बाबतीत गरीब ग्राहक डोळ्यासमोर ठेवून शेतमाल महाग होऊ नये असं धोरण आखलं जातं. पण साखर मात्र ग्राहकांनी ते शेतकरी असले तरी महाग विकत घ्यावी असे धोरण आहे! साखरेवर निर्यात अनुदान आहे, ते घेऊनही साखर निर्यात परवडत नाही असे कारण सांगून त्याचे 'बफर स्टॉक' करण्यासाठी बिनव्याजी कर्ज उपलब्ध केलेलं आहे. इतर पिकांचे असे स्टॉक करून ठेवले तर त्याला 'साठेबाजी' केली म्हणून कारवाई केली जाते. शिवाय वाहतूक अनुदान आहेच. सरकारकडे जो अबकारी कर जमा होतो त्यापैकी काही रक्कम बिनव्याजी व सॉफ्ट लोन म्हणून दोन वेळा सरकारने देऊ केली. आता पुन्हा तिसऱ्यांदा १० हजार कोटी असेच सॉफ्ट लोन प्रस्तावित आहे. सरकारी तिजोरीतून इतका पैसा साखरेसाठी मिळत असेल तर साखरसम्राटांनी पाण्याच्या दुष्काळाचा विचार कशासाठी करावा? त्यामुळे मिळेल तिथून मराठवाड्यात रेल्वेने पाणी नेऊ पण ऊसाला नख लागू देणार नाही अशा मुजोर मनःस्थितीत साखर सम्राट आहेत.

इकडे ग्रामीण महाराष्ट्र पिण्याच्या पाण्यासाठी तडफडतो आहे. शहरातील पाणी पुरवठ्यावर दिली जाणारी अनुदानं कमी करावीत, अशी मागणी शेतकरी संघटनेच्या विजय जावंधिया यांनी केली आहे. त्यांनी अमीर खानलाही सूचना केली आहे की 'वॉटर कप'साठी दिल्या जाणाऱ्या पारितोषिकांमध्ये एक पारितोषिक पाण्याचा कमीत कमी उपसा करणाऱ्या गावालाही द्यावे. कोण मनावर घेतं बघू! ●